ISSN 2229-4406

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

# UNIVERSAL
## RESEARCH ANALYSIS

(UGC Approved & Peer Reviewed Research Journal)

Year - IX, Issue - XVII, Vol.- IV

Impact Factor 5.35
(GRIFI)

Sept. 2018 To Feb. 2019

URA

**EDITOR IN CHIEF**

**Prof. Jarachand Yadav**

Issue : XVII, Vol. IV
UNIVERSAL RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 5.35
ISSN 2229-4406
Sept. 2018 To Feb. 2019

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Tq. Sonpeth Dist. Parbhani

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | E-Commerce And Its Impacts On Business And Global Market<br>**Dr. Manisha Arvind Kotgire** | 1 |
| 2 | Information Technology Application in Business and its Growth<br>**Dr. Vikas Choudhari** | 7 |
| 3 | Work Life Balance a Challenge for Indian Women<br>**Karansinh Avinashrao More** | 14 |
| 4 | Human Development Index: An Overview<br>**N.N. Nanwate, Dr. S.R. Nimbore** | 20 |
| 5 | Economic Growth and Impact of Service's Sector in India<br>**Dr. P.M. Mule** | 26 |
| 6 | Indian Agriculture Sector Impact on GDP<br>**Shankar L. Sawargaonkar** | 32 |
| 7 | Economic & Social Development through Sport Sector in India<br>**Dr. Madhav R. Dongre** | 37 |
| 8 | जी. एस. टी. चे फायदे व परिणाम<br>**डॉ. एम. डी. कच्छवे** | 42 |
| 9 | बळीराजा : दशा व दिशा<br>**नासिर एम. पठाण** | 48 |
| 10 | भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या - एक अभ्यास<br>**डॉ. एन. व्ही. होदलूरकर** | 55 |
| 11 | औरंगाबाद जिल्हयातील जमीन अधिग्रहणाचे आर्थिक व सामाजिक परिणाम<br>**डॉ. डी. डी. सुपेकर** | 61 |
| 12 | भारतीय कृषी क्षेत्रातील कर्जबाजारीपणा व शेतकऱ्यांची आत्महत्या<br>**एच. व्ही. केळे** | 67 |
| 13 | बीड जिल्हयातील शेतकरी आत्महत्या:एक भौगोलिक अभ्यास<br>**डॉ. जे. के. जाधव** | 72 |

Issue : XVII, Vol . IV
UNIVERSAL RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 5.35
ISSN 2229-4406
Sept. 2018 To Feb. 2019 

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

8

# जी. एस. टी. चे फायदे व परिणाम

**डॉ. एम. डी. कच्छवे**
वाणिज्य विभाग प्रमुख,
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय,
सोनपेठ, जि. परभणी

**Research Paper - Commerce**

**प्रस्तावना** (Introduction) :-

'एक देश एक कर' हे उद्दिष्ट लक्षात घेवून करण्यात आलेला स्वातंत्र्योत्तर काळातील अप्रत्यक्ष कर प्रणाणीतील सर्वात महत्त्वाचा बदल आहे. देशातील विविध राज्या राज्यामधील तफावत दूर करण्याच्या हेतूने आणि ग्राहकास वस्तू व सेवा स्वस्त दराने मिळाव्यात या हेतूने 'वस्तू व सेवा कर' जीएसटी (GST) ही कर प्रणाली भारत सरकारने दि. ०१.०७.२०१७ पासून आंमलात आणली. यामुळे भारतातील सर्व राज्याचे आपापले कर कायदे रद्द होऊन एक समान नवीन जीएसटी सर्व राज्यात आंमलात आला. संपूर्ण देशात एकच कर लागू झाल्यामुळे स्वातंत्र्यानंतर कर प्रणालीत झ ालेला सर्वात मोठा बदल म्हणावा लागेल.

केंद्र शासनाकडून वेगवेगळ्या वस्तूवर उत्पादन शुल्क, अतिरिक्त उत्पादन शुल्क, अतिरिक्त सीमा शुल्क, विशेष अतिरिक्त शुल्क अशा प्रकारचे वेगवेगळे कर लावले जातात. तसेच सेंवावर सेवा कर लावला जातो. राज्य शासनाकडून वॅट, केंद्रीय विक्री कर, खरेदी कर, मनोरंजन कर, लॉटरी कर, जकात कर, प्रवेश कर असे विविध प्रकारचे कर लावले जातात. याशिवाय केंद्र व राज्य शासनामार्फत वेगवेगळे उपकरही लावले जातात. जीएसटी मध्ये आता हे सर्व वेगवेगळे कर जाऊन फक्त एकच कर जीएसटी असेल. जो सर्व वस्तू व सेवावर आकारला जाईल. एखाद्या वस्तूवर जो जीएसटीचा कराचा दर असेल तो संपूर्ण भारतात एकच दर असेल. जीएसटीमुळे केंद्र व राज्य सरकार हे वेगवेगळे कर आकारण्यात येत होते. ते जाऊन आता वेगवगळे कर आकारणी जाऊन एकच कर

आकारण्यात येत आहे.

भारतात १ जुलै २०१७ पासून वस्तू व सेवा कर हा एकच अप्रत्यक्ष कर लागू करण्यात आला. देशभरात एक समान कर प्रणाली असावे या उद्देशाने केंद्र व राज्य शासनामार्फत लागू असलेले अनेक अप्रत्यक्ष कर रद्द करुन ही कर प्रणाली भारतात लागू करण्यात आली. जीएसटी लागू करण्यासाठी भारताच्या राज्य घटनेत दुरुस्ती करून नवीन कायदे करण्यात आले. 'गुडस ॲन्ड सर्व्हिसेस काऊन्सील' ही मध्यवर्ती वैधानिक संस्था जीएसटीचे नियमन करते. केंद्रीय अर्थमंत्री संसदेचे विशेष अधिवेशन झाले त्या राष्ट्रपतीनी मध्यरात्रीच्या सुमारास जीएसटी लागू झाल्याची अधिकृत घोषणा केली. जीएसटी अंतर्गत १ जुलै २०१७ पासून ०%, ५%, १८% व २८% असे कर दर ठरविण्यात आले. १९८६ मध्ये विश्वनाथ प्रतापसिंह ने अप्रत्यक्ष कर व्यवस्थेची सुधारणा प्रक्रिया सुधारित मूल्यवर्धित कर सुरु केली.

**संधोधनाचे उद्देश :-**

संशोधनाचे उद्देश खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहेत.

१. जीएसटीची संकल्पना स्पष्ट करणे.

२. जीएसटीचे फायदे शोधणे.

३. जीएसटीच्या परिणामाचा अभ्यास करणे.

४. निष्कर्ष काढणे.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

**संशोधनाची गृहितके :-**

संशोधनाची गृहितके खालील प्रमाणे ठरविण्यात आली.

१. जीएसटीमुळे संपूर्ण भारतात एकच करप्रणाली झाली.

२. ग्राहकांना एकदाच कर द्यावा लागतो.

३. ग्राहकांना संपूर्ण भारतात एकाच किंमतीला वस्तू व सेवा मिळतात.

**अभ्यासपद्धती :-**

सदर शोध निबंधासाठी द्वितीयक साधन सामग्रीचा वापर करण्यात आला असून त्यात संदर्भ ग्रंथ, दैनिक वर्तमानपत्रातील लेख, मासीके, इंटरनेट इ. चा वापर करुन निश्चित उद्देशानुसार शोधनिबंध तयार करण्यात आला आहे. जीएसटी कायद्यानुसार २१ सदस्य असलेल्या समिती स्थापना करण्यात आली आहे. जीएसटी कायदा जम्मू व काश्मीर वगळता भारताच्या सर्व राज्ये व केंद्रशासीत प्रदेशाला लागू आहे. १ जुलै २०१७ पासून कर सवलत सुलभ करण्यासाठी मार्ग तयार करतात. २०११ मध्ये माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी सर्वात अगोदर वस्तू व सेवा कराचा प्रस्ताव लोकसभेत सादर केला आणि २०१७ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात याची अंमलबजावणी झाली. वस्तू व सेवा यांच्या उपभोगावरील कर म्हणजे जीएसटी. जीएसटी म्हणजे देशभरात एकच

करप्रणाली.

**जीएसटी (GST) :-**

जीएसटी म्हणजे वस्तू व सेवा कर असून तो वस्तू किंवा सेवांवर हा एकच कर १ जुलै पासून यापुढे लागू राहील. अनेक विकसित देशात याच पद्धतीची करप्रणाली अस्तित्वात आहे. त्यामुळे कर आकारणीत सुटसुटीतपणा आलेला आहे. करप्रणाली सुधारण्याच्या दृष्टीकोनातून हे बिल फारच महत्त्वाचे आहे. कॉंग्रेसच्या राजवटीत २००६-०७ च्या अंदाजपत्रकात GST चा उल्लेख करण्यात आला होता. GST हा एक अप्रत्यक्ष कराचाच एक प्रकार आहे. निर्यात, आयकर आणि कॉर्पोरेट टॅक्स या कराच्या कक्षेच्या बाहेर येतात. केंद्र सरकार व राज्य सरकार जे निरनिराळे अप्रत्यक्ष कर लावतात त्यासर्व कराची जागा जीएसटी घेणार आहे. अबकारी कर, व्हॅट कर, करमणूक कर, जकात, प्रवेश कर, चैनीच्या वस्तूवरील कर, खरेदी कर इत्यादी कराऐवजी एकच कर आकारण्यात येणार आहे.

**जीएसटी टॅक्स आकारणी :-**

० %, ५ %, १२ %, १८ % आणि २८ % असे वेगवेगळी स्लॅब आहेत.

**१. ० % जीएसटी दर सेवा :**

बस, ॲटो, शिक्षण, आरोग्य, धार्मिक व चॅरिटेबल सेवा, टोल, वीज, निवासी, घर भाडे, संग्रहालय, जनधन व अटल पेन्शल योजना मेट्रो, नॉन एसी ट्रेन तिकीट, दुध, मीट, पीठ, दाळ तांदूळ इत्यादी.

**२. ५ % जीएसटी दर सेवा :**

ट्रेन किंवा ट्रकमधून मालवाहतूक, एसी ट्रेनची तिकीटे, कॅब सेवा, विमान, टूर ऑपरेटर सेवा, विमानाची लिजींग.

**३. १२ % जी एसटी दर सेवा :**

रेल्वे कन्टेनरकडून सामान वाहतुक, विमानाचे बिझीनेस क्लॉस तिकीट, नॉन एसी रेस्टारेंट मध्ये भोजन, दर रोज १०००-२५०० रुपये भाडेकरार हॉटेल, बिल्डींगच कन्स्ट्रक्शन, पेटंट.

**४. १८% जीएसटी दरसेवा :**

फोन बील, बॅकिंग, विमा आणि इतर वित्तीय सेवा, एससी रेस्टारेंटस सर्कस, क्लासिकल नृत्य, थिएटर आणि ड्रम, २५० रुपये पेक्षा आधीकची तिकटे.

**५. २८ % जीएसटी दर :**

चित्रपट तिकीट, थीम पार्क, वॉटर पार्क, कॅसिनो, बॅले, आयपीएल फाइव्ह स्टार हॉटेल, गॅम्बलींग इत्यादी.

**जीएसटी फायदे :-**

जीएसटीमुळे कर भरण्याच्या, आकारण्याच्या पद्धतीत सहजता आणि सुलभता येईल.

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

... Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



२. कराची चोरी किंवा कर न भरणे किंवा कमी भरणे कमी होईल.

३. देशाचे जीडीपी वाढून प्रगतीचा वेग वाढेल.

४. संपूर्ण देशात सामान खरेदीवर एकाच दराने एकच कर द्यावा लागेल.

५. विविध कर भरण्यापासून सुटका होईल. उदा. कर वसुली, कर आकारणी, कर चुकवेगिरी इत्यादी.

६. राज्यांना मिळणारा व्हॅट, लक्झरीकर, लॉटरी कर, विक्री कर बंद होऊन Tax च्या रचनेत पारदर्शकता येईल.

७. वस्तू व सेवा या दोन्हीवर हा जीएसटी कर लावला जाईल.

८. कर वाचविण्यासाठी कंपन्या आपली उत्पादने राज्यातल्या राज्यातच विकत असत. चांगली उत्पादने जीएसटीमुळे ग्राहकांना संपूर्ण देशात मिळतील.

९. जीएसटीमुळे असंघटीत उद्योगही कराच्या जाळ्यात येतील त्यामुळे शासनाचे उत्पन्न वाढेल. संघटीत आणि असंघटीत क्षेत्रातील दरी कमी होईल.

**जीएसटीचे परिणाम :-**

संपूर्ण देशात अप्रत्यक्ष कराच्या एकसमान पद्धतीकरिता जीएसटी (Goods and Service Tax) प्रणालीचा अवलंब करण्याचा निर्णय केंद्र व राज्य सरकारने घेतला.

**१. करावर कर लागत नाही :-**

देशात जीएसटी पूर्वी करावर कर लावला जात होता. केंद्रीय उत्पादन शुल्क भरल्यानंतर तो माल बाजारात आणल्यानंतर त्यावर व्हॅट लावण्यात येत होता. व्हॅट लावत असताना केंद्रीय उत्पादन शुल्क वजा होत नव्हते. या नवीन जीएसटी पद्धतीत करावर कर लावण्याची त्रुटी दूर झाली आहे.

**२. व्यवहारात पारदर्शता :-**

खरेदीदाराला व्यवहारात बील द्यावे लागत आहे. शासनाने बँकींग क्षेत्रातील व्यवहारांना चालना देण्यासाठी विविध तरतुदी आयकर कायदा १९६१ तसेच जीएसटीत केल्यामुळे अधिकाधिक व्यवहार पारदर्शक होऊन त्याचा फायदा सर्वांना होईल. पारदर्शकता अधिक असल्यास कर चुकविण्याची मानसिकता कमी होऊन व्यवस्थित कर भरण्यात येईल. त्यामुळे सर्वसामान्य जनतेस त्याचा प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष फायदाच होईल.

**३. हिशोबात नियमितता :-**

जीएसटी प्रणालीत विवरणपत्र भरणे, सेटऑफ घेणे याकडे पाहता हिशोब नियमितपणे ठेवणे आवश्यक असल्यामुळे हिशोबात नियमितपणा व खरेपणा येईल. त्यामुळे स्थितीविवरण, नफा - तोटा पत्रक इत्यादी आर्थिक विवरणांची विश्वसनीयता वाढेल. ही बाबा व्यापारी, अकांउंटट, सल्लागारांच्या

दृष्टीने हितकारक आहे. नियमीत हिशोब ठेवल्यामुळे व्यवसायाचा नफा - तोटा नियमीतपणे लक्षात येऊन व्यवसाय अधिक चांगल्या फायदेशीर दृष्टीकोनातून करणे व्यापाऱ्यांना शक्य होईल.

**४. व्यापारी व सल्लागारांना फायदा :-**

संपूर्ण भारतात जीएसटी पूर्वी व्यापारी आणि सल्लागार यांचा वेगवेगळ्या सरकारी यंत्रनांशी संपर्क येत होता. उदा. केंद्रीय उत्पादन शुल्क, सेवाकर विभाग, विक्रीकर विभाग इत्यादी या नवीन कर प्रणाली मुळे आता एकच जीएसटी विभागाशी संबंध असल्यामुळे करविषयक सर्व कार्ये अधिक सुलभतेने व सहजतेने करता येतील.

**५. नफेखोरीस प्रतिबंध :-**

जीएसटीमुळे संपूर्ण भारतात वस्तूच्या किंमती एकच राहणार आहेत. त्यामुळे सर्वसामान्य ग्राहाकाची फसवणूक होणार नाही. कोणत्याही राज्यांतून मालाची खरेदी केल्यानंतर दुसऱ्या राज्यात जास्त किंमतीने विकणे, नफेखोरी करणे इत्यादी या जीएसटीमुळे बंद झाले आहे.

**६. करातून सवलत :-**

जीएसटीमुळे आवश्यक वस्तू आणि सेवांना करातून सूट देण्यात आली आहे. आर्थिक उलाढाल कमी प्रमाणात असणाऱ्या व्यापाऱ्यांना नोंदणी करणे आवश्यक नाही. नोंदणी झालेल्या आणि कमी उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांना हिशोब ठेवण्यातून सूट देण्यात आली आहे.

**७. न्यायव्यवस्थेस सुलभ :-**

जीएसटी निर्णयापूर्वी वेगवेगळ्या हायकोर्टाचे वेगवेगळे निर्णय देण्यात येत होते. परंतु जीएसटीमुळे न्यायनिवाड्यातील क्लिष्टता संपुष्टात येऊन एका बाबतीत एकच निर्णय संपूर्ण देशभरात लागू होणार आहे. यामुळे प्रशासन अधिक सुलभतेने चालेल. वादविवाद आणि न्यायिक प्रलंबन, क्लिष्टता कमी होवून न्यायव्यवस्थेस, प्रशासन व्यवस्थेस आणि सल्लागारांना कार्य करण्यास सहजता येईल.

**८. जुने बदलले :-**

केंद्रीय उत्पादन शुल्क कायदा, १९४४, वित्त कायदा १९९४, मूल्यवर्धीत कायदे इत्यादी जुने कायदे बदलून एकच नवीन जीएसटी कायदा आणल्यामुळे जुनी मानसिकता बदलून नवीन सुधारणा झाली आहे.

**९. ग्राहक :-**

जीएसटीचा मुळ उद्देश ग्राहकांना वस्तू आणि सेवा स्वस्त दरात उपलब्ध करणे हा आहे. करावर कर न लावणे, नफेखोरीस प्रतिबंध, संपूर्ण भारतभर कराचा एकच दर इत्यादीमुळे ग्राहकांची फसवणूक होण्याचे प्रमाण कमी होईल.

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

१०. टोल नाक्यावरील गर्दी :-

प्रत्येक टोल नाक्यावर टोल भरण्यासाठी लांबच लांब रांगा लागणे कमी होईल. तसेच होणारी वाहतुकीची कोंडी कमी होईल. वेळेत बचत होईल.

११. ज्या कंपन्यांच्या मालाची आंतरराज्यीय वाहतूक होते. माल या गोदामातून त्या गोदामातून किंवा या शहरातून त्या शहरात वाहतूक होते. त्यांच्या या वाहतुकीवर लागणाऱ्या करांत बचत होईल.

**निष्कर्ष :-**

जीएसटीच्या जुन्या विधेयकानुसार राज्यातील व्यापाऱ्यावर तीन वर्षासाठी एक टक्का अतिरिक्त कर आकारण्याची तरतूद होती. राज्यामधील उद्योगावर एक टक्का अतिरिक्त कर लावण्याचा निर्णय मागे घेण्यात आला. जीएसटीची या विधेयकात संकल्पना स्पष्ट करण्यासाठी एक नवी तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे राज्य आणि सर्व सामान्यांना नुकसान होणार नाही. जीएसटीमुळे चहा, कॉफी, सर्व्हीसेस, मोबाईल, ज्वेलरी, रेडीमेड गारमेंटस महाग होवू शकतात. तसेच देवाण - घेवाणीवर व्हॅट आणि सर्व्हिस टॅक्स लागणार नाही. सध्या इलेक्ट्रॉनिक वस्तूवर १२.५ टक्के एक्साईज आणि १४.५ टक्के व्हॅट लागतो. जीएसटीमुळे १८ टक्के टॅक्स लागेल. जीएसटीमुळे राज्यांचे मूल्यवर्धित कर, विक्री कर, लॉटरी, जुगार व सट्टेबाजीवरील कर, करमणूक कर, राज्याचे उपकर, अधिभार, चैनीच्या वस्तूवरील कर, खरेदी कर, जकात व प्रवेश कर हे सर्व कर राहणार नाहीत. शेतमाल बाजार समिती द्वारा विकावा लागतो. यासाठी सेस लागतो. इथपासून विविध करांची सुरुवात होते.

जीएसटी ची बैठक वारंवार होत असते त्यात जीएसटी च्या वस्तू बदल दिसून येतात.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani